जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळ, जुन्नर

# श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि. पुणे

(कला-वाणिज्य-विज्ञान)

उत्कृष्ट महाविद्यालय, पुरस्कार प्राप्त - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

नॅक मुल्यांकित - 'अ'

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत

राज्यस्तरीय मराठी चर्चासत्र

## नव्वदोत्तर समग्र मराठी साहित्य

दि. २० फेब्रुवारी २०१६



# स्मरणिका

ISBN NO : 978-93-84309-12-1

संयोजक
डॉ.भास्कर शेळके

सहसंयोजक
डॉ.जयराम खाडे
डॉ.सौ.वंदना नढे

प्रकाशक
डॉ.भास्कर शेळके

ISBN NO : 978-93-84309-12-1
नवदोत्तर समग्र मराठी साहित्य

# !! अनुक्रमणिका !!

| अनु क्र. | लेखाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| १ | नव्वदोत्तर मराठी साहित्याचा सांस्कृतिक विसंवाद | डॉ.प्रभाकर देसाई |
| २ | नव्वदोत्तर माध्यमांतर समीक्षा | प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे |
| ३ | नव्वदोत्तर मराठवाडयातील ग्रामीण कविता : शोध व बोध | प्रा. डॉ. अनिल गर्जे |
| ४ | नावदोत्तरी आंबेडकरवादी कविता | डॉ. अनंत राऊत |
| ५ | नव्वदोतर स्त्री कवयित्रीच्या कवितांची वैशिष्टे | डॉ. विजया पाटील |
| ६ | २००० नंतरची निवडक ग्रामीण कांदबरी स्वरुप व वैशिष्ट | प्रा. गोकुळ शिखरे |
| ७ | नव्वदोत्तरी मराठी कविता कालखंड आणि नवपरिमाण | एस.पी.पवार |
| ८ | १९९० नंतरची ग्रामीण कादंबरी | प्रा.डॉ.रावसाहेब उत्तमराव चव्हाण |
| ९ | नव्वदोत्तरी मराठी आदिवासी कादंबरी | प्रा. मुक्ता राजेंद्र आंभेरे |
| १० | 'पाडा' मधील व्यथा वेदना | शिंदे माणिक काशिनाथराव |
| ११ | " १९९० नंतरचे मराठी साहित्य " | डॉ. वंदना वि. नढे |
| १२ | १९९० नंतरच्या कथा : वृंदा दिवाण | प्रा. डॉ. सौ. मंगल ए. डोंगरे |
| १३ | बारोमास : भारतीय कृषी संस्कृतीचा लेखाजोखा | प्रा. गणपत काशीबा हराळे |
| १४ | नव्वदोत्तरी मराठी कविता | प्रा. संदीप चपटे |
| १५ | अदिवसी स्त्रियांचे काव्यलेखन | प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, घोडेगाव |
| १६ | नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी | डॉ. शशिकांत साळवे |
| १७ | नव्वदोत्तरी मराठी दलित कादंबरी | डॉ. भास्कर टी. शेळके |

ISBN NO : 978-93-84309-12-1
नवदोत्तर समग्र मराठी साहित्य

डॉ. वंदना वि. नढे
श्री शिव छत्रपती महाविद्यालय,
बोडकेनगर, जुन्नर
मराठी विभाग
मो. नं.– ९९७५८६१९९७

# " १९९० नंतरचे मराठी साहित्य "

**प्रास्ताविक –**

१९९० ते २००० ह्या कालखंडात मराठीतील साहित्यातून चित्रित झालेली देवदासी स्त्री अभ्यासण्याआधी १९७० ते १९९० पर्यंतचा कालखंड अभ्यासणे अनिवार्य आहे. म्हणून १९७० ते १९८० आणि १९८० ते १९९० असे दोन कालखंड केले. कारण देवदासीविषयक कायदा १९३४ ला संमत झाला होता त्या कायद्यात सुधारणा होऊन १९७५ मध्ये अंमलात आला. त्याचा परिणाम सर्व देशावर झाला.

**१९७० ते १९८० पर्यंतचा पहिला टप्पा –**

ह्या काळातील कलाकृतीतील नायिका बंधनात जखडलेली, परमेश्वरविषयक श्रद्धा जपणारी, स्वत:ला परमेश्वराची सेवा करायला मिळाली म्हणून भाग्यवान समजणारी स्त्री बंधन स्वीकारताना दिसते. म्हणून हा काळ आजीचा म्हणजे पुराणमतवादी विचार असणाऱ्या स्त्रीचा कालखंड आहे, असे वाटते.

उदा. १) वर आभाळ खाली धरती – महादेव मोरे २) जोगीण – सुभाष भेंडे

या कलाकृतींचा उल्लेख करता येईल.

**१९८० ते १९९० पर्यंतचा दुसरा टप्पा –**

ह्या कालखंडातील स्त्री पिढीजातत्तेने, जबरदस्तीने, आगतिकतेने, जगण्यासाठी व उदरनिर्वाहासाठी दुसरा पर्याय नाही म्हणून देवदासी बनलेली दिसते. त्या देवदासी स्त्रीला परिवर्तनाची इच्छा असूनही ती त्याला विरोध करु शकत नाही. म्हणून हा काळ जणू आईचा काळ आहे, असे वाटते.

उदा. १) नापत – बळवंत कांबळे २) चौंडकं – राजन गवस

३) झुलवा – उत्तम बंडू तुपे ४) भंडारभोग – राजन गवस

**१९९० ते २००० तिसरा टप्पा –**

वास्तविक पाहता, देवदासी संरक्षण कायदा १९३४ मध्येच संमत केला होता. परंतु प्रत्यक्षात हा कायदा कागदावरच राहिला. खऱ्या अर्थाने १९७५ पासून देवदासींच्या पुनर्वसनेची चळवळ पुन्हा वेगाने कार्य करु लागली. देवदासी भगिनी परिषद, राज्य देवदासी मुक्ती संघटना, चौंडकं मोर्चा या परिषद व मोर्चाबरोबर त्यांच्या पुनर्वसनाच्या योजना राबविल्या गेल्या. एक अभ्यास गट नेमून देवदासीविषयक अहवाल तयार केला गेला. या प्रथेविषयी देशभर जाणीव जागृती घडू लागली.

ISBN NO : 978-93-84309-12-1
नवदोत्तर समग्र मराठी साहित्य

१९९० नंतरच्या साहित्यकृतीतून देवदासी स्त्री प्रथेविरुद्ध (बंड) लढा देण्यास सज्ज झालेली दिसते म्हणजे १९७५मध्ये देवदासी प्रथेविरुद्धचा कायदा पुन्हा अंमलात आला.जो वर्ग समाजापासून, सुधारणांपासून वंचित होता, जो धार्मिक रुढी – परंपरांच्या शृंखलांनी जखडलेला होता, त्या स्त्रियांमध्ये वैचारिक परिवर्तन घडले. त्यामुळे त्या स्त्रिया प्रथांना प्रखरपणे विरोध करु लागल्या. या सर्व घडामोडींना ३०वर्षाचा काळ लागला. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर समाजात सामाजिक, राजकीय, वैचारिक तसेच आर्थिक स्थित्यंतरे घडली. मानवी हक्काची जाणीव प्रत्येक व्यक्तीला, जाती – धर्माला झाली. त्याचा पडसाद कळत नकळत समाज मनावर व व्यक्तिमनावर उमटला. त्यातून नवा प्रवाह निर्माण झाला. त्यातच अशा स्त्रियांसाठी शासनाने ठोस पावले उचलली.

साहजिकच या चळवळींमुळे देवदासी स्त्रियांच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले गेले. देवदासी स्त्री शिकली तरच धर्मकांडाविषयी जाणीव जागृती होईल व ती स्वतः त्यातून मुक्त होईल, असा विश्वास शासनाला वाटला. म्हणून शासनाने अनेक उपाययोजना आखल्या आणि त्या अमंलात आणल्या. त्याचा परिणाम म्हणजे कलाकृतीला नाविन्यपूर्ण विषय मिळाला व लेखकांनी साहित्याद्वारे तो चित्रित केला.

**१९९० ते २००० काळातील साहित्य –**

१) सौंदतीच्या वाटेवर – सुरेश माने
२) जोगव्याचे दिवस – बळवंत कांबळे
३) गावभोग – बळवंत कांबळे
४) भंडारा – रामनाथ चव्हाण
५) जोकतीण – शंकरराव खरात
६) मुरळी – श्शंकरराव खरात
७) मुरळी – व.बा.बोधे

या साहित्यातील सुशिक्षित देवदासी स्त्रिया जोडीदाराच्या सहाय्याने देवदासी प्रथेविरुद्ध लागल्या. ही प्रथा धर्माच्या नावाखाली चाललेली फसवेगिरी आहे, हे देवदासी होणाऱ्या स्त्रियांना जाणवले. म्हणून त्या नैराश्याच्या, उदासिनतेच्या वलयाबाहेर येऊन संघटित झाल्या, व प्रथेविरुद्ध क्रांतीची ज्योत पेटविण्यास सज्ज झाल्या.

उदा.– सौंदतीच्या वाटेवर – काव्य – "जोगवा जोगवा न्हाय मागायचा जोगवा

आयानू, माझ्या भगिनिंनो ज्योत क्रांतीची पेटवा"

यातून समाजातील धार्मिक प्रथा – परंपरांविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने लेखकांना नवा विषय मिळाला. या नव्या रचनेचा अंगीकार सामान्य माणूस चिकाटीने, धैर्याने व चाकोरीबद्ध जीवन प्रणाली सोडून करु लागला. लेखकाच्या या कार्यामुळे परिवर्तनाचा स्वीकार समाजातील व्यक्ती हळूहळू करू लागली. या नव्या रचनेमुळे देवदासी होणाऱ्या स्त्रियांच्या मानसिकतेत बदल घडू लागला.

(१९९०ते २०००) या काळात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचाराने मानवाची वैचारिक क्षमता वाढली त्यामुळे समाजातील प्रथा–परंपरामागील धर्ममार्तंडाचा स्वार्थ हेतू समाजातील घटकांना जाणवू लागला. त्यामुळे त्यांना प्रतिष्ठा मिळावी, या शासनाच्या धोरणाला त्यांनी पाठिंबा दिला. त्यांनी

नवदोत्तर समग्र मराठी साहित्य

ISBN NO : 978-93-84309-12-1
नवदोत्तर समग्र मराठी साहित्य

प्रथेमागची धार्मिकता स्वतः तपासली त्या शिकल्या, सुशिक्षित झाल्या, नोकरी – व्यवसाय करू लागल्या.

उदा. शंकरराव खरात यांच्या "जोकतीण " कथेतील शीला शिकल्याने त्या प्रथेस विरोध करते व त्यांच्या पतीबरोबर सुखी संसारात रमते तर "जोगव्याचे दिवस" ह्या कादंबरीतील बळवंताचे वडील अंधश्रद्धेविरुद्ध लढा देतात. तर सुरेश माने हे "सौंदत्तीच्या वाटेवर" ह्या काव्यसंग्रहात प्रथेविरुद्ध क्रांती घडवतात.

"गाव–शिव" कथासंग्रहातील "मुरळी"या कथेतील गीता, "भंडारा" कादंबरीतील रत्ना, व. बा. बोधे यांच्या "मुरळी" कादंबरीतील राधा ह्या सर्व स्त्रियांना ही प्रथा थोतांड आहे, याची जाणीव झालेली दिसते. त्यावेळी त्यांना भक्कम आधार मिळतो तो त्यांच्या पतीचा म्हणून राधाला सुभानराव,शीलाला सुशिक्षित जोडीदार, बळवंत कांबळेचे वडील हे सर्व पुरुष त्यांना सहकार्य करतात.

हा नवा विचार वाचक वर्गाला पटावा, तो आपल्याच गावचा आहे, असे वाटावे म्हणूनच लेखकांनी संवादासाठी ग्रामीण बोलीचा वापर केला आहे, तर निवेदनासाठी प्रमाण भाषेचा वापर केला आहे. त्यामुळेच उपेक्षित, दुर्लक्षित समाजाचे, जमातीचे, त्यांच्या व्यथेचे, भोगवादाचे, शोषणाचे, प्रदेशातील समूहाच्या मानसिकतेचे, अंधश्रद्धेचे, नैतिकतेचे दर्शन घडते.

उदा. १) "शाळा शिकणं आपल काम न्हाय पोरा, तू खंडोबा चा वाघ्या हाईस. त्याच्या नावानं भंडारा खोबरं उधळून वारी मागून पॉट भर. या शाळंतल्या पोरांच्यात मिसळू नगंस" (भंडारा –रामनाथ चव्हाण )

२) "ती कवाच पळाली किस्न देवाला घिवून, मुड्या, तूच हपापलास पैशाला !"

(मुरळी–व.बा. बोधे)

निष्कर्ष :–

१. पिढीजाततेस विरोध

२. पुरुषांच्या भोगवादीवासनेला विरोध

३. स्त्रीला स्त्रियांचा आधार

४. परंपरेमागे स्वार्थ भावनेची जाणीव

५. नवीन पिढीस त्या प्रथेपासून दूर ठेवण्याचा विचार

६. पुरुषांचा आधार